| MHYA070006732017 | दाखल दिनांक | : | ०९/०६/२०१७ |
|---|---|---|---|
| | नोंदणी क्रमांक | : | ०९/०६/२०१७ |
| | निकाल दिनांक | : | ०६/०८/२०२६ |
| | कालावधी | : | व. म. दि. |
| | | | ०९ ०१ २८ |

**दारव्हा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी श्री निलेश ल. पाटील)**

**न्यायनिर्णय घोषीत दिनांक– ०६/०८/२०२६**

**(नियमित फौजदारी खटला क्रं. ४२/२०१७)**

**गुन्हा नोंद क्रं.१८/२०१७ पोलीस स्टेशन लाडखेड निशाणी क्र.२७**

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी/तक्रारदार** | | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>**लाडखेड** पोलीस स्टेशन, दारव्हा. |
| **अभियोग पक्षातर्फे** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री सी. बी. ऊके |
| **आरोपी** | | **खोलेश्वर सिताराम राठोड**<br>**वय**–५० **वर्ष, व्यवसाय**–मजुरी<br>रा.तिवसा, ता.जि.यवतमाळ |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | | **श्री. एस. आर. चव्हाण** |

**<u>भाग – ब</u>**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण ५ मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये )**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | ०९/०१/२०१७ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | ०९/०१/२०१७ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २५/०५/२०१७ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | १२/१०/२०१८ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | २८/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | ०६/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | आरोपीला निर्दोषमुक्त करण्यात येते. |

**आरोपींची माहिती**

| आरोपी | आरोपी चे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम अन्वये समायोजित करणयाबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **खोलेश्वर सिताराम राठोड** | दिनांक १२/०१/२०१७ | दिनांक १२/०१/२०१७ रोजी जामिनावर सोडले | भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०६ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

**भाग – क**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण ६ मधील परिच्छेद ....अन्वये )

सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयील साक्षीदार

अ. अभियोग पक्ष

| सा.क्रं. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | जिवन वसराम राठोड | फिर्यादी | २० |

**न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | ११ | दोषारोप |
| २ | १२ | आरोपीचे निवेदन |
| ३ | २१ | फिर्यादीवरील सही |
| ४ | २२ | प्रथम खबरी अहवालावरील सही |
| ५ | २३/आरोपींस मान्य | फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ६ | २४/आरोपींस मान्य | घटनास्थळ पंचनामा |
| ७ | २५/आरोपींस मान्य | जप्ती पंचनामा |
| ८ | २६ | आरोपीची फौ. प्र. सं चे कलम ३१३ प्रमाणे नोंदविलेला जबाब |

## न्यायनिर्णय

(दिनांक ०६/०८/२०२६ रोजी घोषीत केले )

अभियोगपक्षाने आरोपी विरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०६ अन्वये खटला दाखल केला आहे.

०२. **अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात पुढील प्रमाणे** –

दिनांक ०९/०१/२०१७ रोजी सकाळी ९.३० वाजेच्या सुमारास मौजे ग्राम तिवसा येथे फिर्यादी किराणा दुकाणातुन सामान घेऊन रोडवर उभा होता त्यावेळी आरोपी दारुच्या नशेत विनाकारण फिर्यादीस शिवीगाळ करीत होता त्यावेळी फिर्यादीने आरोपीस "*तु शिवा का देतो*" असे म्हटले असता फिर्यादीस आरोपीने

शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली व आरोपीने त्याच्या हातातील लोखंडी विळ्याने फिर्यादीच्या डोक्यावर, उजव्या हाताच्या दांडावर मारून जखमी केले. त्यामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशन लाडखेड येथे सदर घटनेची तक्रार दाखल केली.

**०३.** सदर फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द पोलीस ठाणे लाडखेड येथे गु.र.नं. १८/२०१७ भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०६ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. तपासणी अधिकारी श्री. महादेव दे. डाखोरे यांनी केलेल्या तपासाअंती आरोपीविरुध्द पुरेसा पुरावा गोळा झाल्याने त्यांचे विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**०४.** दिनांक १२/१०/२०१८ रोजी आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०६ अन्वये **निशाणी क्र.११** कडे दोषारोप नोंदविण्यात आला. सदर दोषारोप आरोपीस त्याच्या मातृभाषेत समजावून सांगण्यात आला असता त्यांनी गुन्हा मान्य नसल्याचे नमूद करुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शवली.

**०५.** अभियोग पक्षाचा पुरावा झाल्यानंत्तर आरोपीविरुद्ध सबळ पुरावा मिळुन आल्याने त्यांची फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ३१३ अन्वये **निशाणी क्र. २६** वर जबानी नोंदविणेत आली.

**०६.** अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील व आरोपीं तर्फे विधीज्ञ श्री एस. आर.

चव्हाण यांचा युक्तिवाद ऐकला.

०७. एकंदर संचिकेतील कागदपत्रे व पुरावे बघता माझे निष्कषार्थ खालील मुद्दा निघतो. त्याचे उत्तर मी कारणमिमांसेसह खालील प्रमाणे दिली आहे.

| अ.क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने सिद्ध केले काय की, दिनांक ०९/०१/२०१७ रोजी सकाळी ९.३० वाजेच्या सुमारास मौजे ग्राम तिवसा येथे फिर्यादी किराणा दुकाणातुन सामान घेऊन रोडवर उभा होता त्यावेळी आरोपी दारुच्या नशेत विनाकारण फिर्यादीस शिवीगाळ करीत होता. त्यावेळी फिर्यादीने आरोपीस "*तु शिवा का देतो*" असे म्हटले असता फिर्यादीस आरोपीने शिवीगाळ करुन त्याच्या हातातील लोखंडी विळ्याने डोक्यावर, उजव्या हाताच्या दांडावर मारून जखमी केले? | नकारार्थी |
| २ | अभियोग पक्षाने सिद्ध केले काय की, वर नमुद तारखेस, वेळी व ठीकाणी आरोपीने फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिली? | नकारार्थी |
| ३ | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष सोडण्यात येते. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ व २ करिता

०८. मुद्दा क्र. १ व २ हे एकमेकांशी संलग्णीत असल्यामुळे त्यांची सर्वांची

कारणमिमांसा मी एकत्रित नोंदवित आहे. तसेच फिर्यादी व आरोपी एकाच गावातील रहीवासी असल्याचे प्रथमदर्शनी लक्षात येते व त्यांच्यातील वाद हा संपुष्टात आला असल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे प्रस्तुत प्रकरणामध्ये महत्वाची बाब म्हणजे फिर्यादी व आरोपीची न्यायालयाबाहेर तडजोड झाली असल्याचे फिर्यादीच्या पुराव्यावरुन लक्षात येते.

०९. अभियोग पक्षाने आरोपी विरुद्व गुन्हा सिध्दतेकरीता फिर्यादी साक्षीदारास तपासले आहे. याकामी अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. १ जिवन वसराम राठोड (फिर्यादी) याची साक्ष अभिलेखावर घेतली असता त्याने त्याच्या साक्षीत कथन केले की, तो आरोपीस ओळखतो. घटना अंदाजे पाच ते सहा वर्षापुर्वी सकाळी ९.०० वाजेच्या सुमारास त्याच्या व आरोपीच्या घराजवळ घडली. त्यावेळी आरोपी व त्याचा शाब्दीक वाद झाला असुन त्याने रागाच्या भरात आरोपीविरुध्द लाडखेड पोलीस स्टेशनला तक्राद दिली. त्या व्यतिरिक्त काहीही घटना घडली नसल्याचे कथन प्रस्तुत साक्षीदाराने केले. प्रस्तुत साक्षीदारास त्याने दिलेली फिर्याद व प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला परंतु त्यावर असलेली केवळ सही त्याने ओळखली असुन त्यातील संपुर्ण मजकुर नाकारला. फिर्यादी साक्षीदार सरकारी पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी पक्षामार्फत उलटतपासाची परवानगी मागुन प्रस्तुत साक्षीदाराचा उलटतपास घेतला. त्यावेळी त्याची व आरोपीची न्यायालयाबाहेर

तडजोड झाली असुन त्याला आरोपीविरुध्द प्रस्तुतचे प्रकरण चालवायचे नसल्याचे कथन केले.

**१०.** तथापी, अभियोगपक्षातर्फे न्यायालयासमोर तपासण्यात आलेल्या फिर्यादी या मुख्य साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन करता त्याने त्याच्या फिर्यादला सुसंगत अशी साक्ष दिलेली नाही. फिर्यादी यांनीच घटना नाकारल्यामुळे इतर साक्षीदारांना तपासण्यात किंवा त्यांच्या साक्षीवर विसंबून राहण्यात काहीच अर्थ उरत नाही. त्यामुळे अभियोगपक्षातर्फे इतर साक्षीदारांना तसेच तपासी अधिकारी, वैद्यकीय अधिकारी यांना देखील तपासण्यात आले नाही.

**११.** प्रस्तुत खटल्यात अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या तोंडी पुराव्याचा विचार करता, दिनांक ०९/०१/२०१७ रोजी सकाळी ९.३० वाजेच्या सुमारास मौजे ग्राम तिवसा येथे फिर्यादी किराणा दुकाणातुन सामान घेऊन रोडवर उभा होता त्यावेळी आरोपी दारुच्या नशेत विनाकारण फिर्यादीस शिवीगाळ करीत होता त्यावेळी फिर्यादीने आरोपीस "*तु शिवा का देतो* " असे म्हटले असता फिर्यादीस आरोपीने शिवीगाळ करुन त्याच्या हातातील लोखंडी विळ्याने डोक्यावर, उजव्या हाताच्या दांडावर मारून जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली, ही बाब शंकेपलीकडे जावून सिध्द होवू शकले नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवीत आहे.

**मुद्दा क्र. ३ करीता**

१२. मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदविल्यामुळे आरोपी हा सदर गुन्हयातून निर्दोष मुक्त करणे गरजेचे आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

१] आरोपी **खोलेश्वर सिताराम राठोड** यास भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०६ गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम २४८ (१) अन्वये **निर्दोष मुक्त** करण्यात येते.

२] आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३] याकामी जप्त मुद्देमाल लाकडी मुठी असलेला लोखंडी विळा ज्याची लांबी १० इंच अर्ध गोलाकार पात्याची लांबी ८ इंच पात्याची रुंदी ३ से. मी हा मुद्देमाल मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर कायदेशीर मार्गाने विल्हेवाट लावावी.

४] आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ च्या पुर्ततेकरीता रक्कम १५,०००/– रुपयाचे वैयक्तिक बंधपत्र लिहून द्यावे. अगर जामिन दयावा.

Digitally signed by NILESH LAXMANRAO PATIL
Date: 2026.08.06 16:18:32 +0530

दारव्हा **( निलेश ल. पाटील )**

दिनांक: ०६/०८/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी (२ रे कोर्ट), दारव्हा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| **Name of Stenographer** | **:-** | Ku Divya R. Gaikwad<br>Stenographer (Grade 3) |
| **Court Name** | **:-** | 2nd Jt. CJJD & JMFC Darwha |
| **Date** | **:-** | 06/08/2026 |
| **Judgment signed**<br>**by presiding officer on** | **:-** | 06/08/2026 |
| **Judgment uploaded on** | **:-** | 06/08/2026 |